**साक्षीदार क्र.१०**
ची साक्ष शपथेवर सुरु

नि.फौ.प्र.क्र ४०/२००९
सरकार ..वि.. गजानन+१
**नि.क्र. १००**

**नाव** – किशोर केववप्रसाद वाजपेयी,
वय – ६४ वर्षे, कामधंदा –सेवानिवृत्त्,
रा. अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती

**सरतपासणी करीता सरकारतर्फे सहा. सरकारी वकील कु. आर. एस. श्रीराव यांच्या मार्फत**

**१.** दि. २३.०१.२००८ मध्ये पो. स्टे. आसेगाव येथे ए.एस.आय. पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी माझी स्टेशनडायरी करीता नेमणुक करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीन यांनी तक्रार दाखल केली होती व सदरची तक्रार मी नोंदवुन घेतली होती. त्या अनुषंगाने मी एफ. आय.आर. दाखल करुन घेतला होता. आता मला नि.क्र. ६३ वरील एफ.आय.आर. दाखविला, हा तोच आहे, त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे समाविष्ठ करण्यात आला होता.

**आरोपीतर्फे उलटतपास : श्री. पाटील वकील यांच्या मार्फत**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने फिर्याद देण्यास वेळ का झाला याबाबतची माहिती मला दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद वरिष्ठांच्या सांगण्यानुसार नोंदविली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद खोटी आहे व खोटी फिर्याद नोंदवुन घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला, फेरतपास काही नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

समक्ष,

**(जी. बी. नंदागवळे)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.२, चांदूर बाजार

**दिनांक – १९.०७.२०२४**